पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता.फुलंब्री जि.औरंगाबाद (महाराष्ट्र)

मराठी विभागाच्या वतीने

( श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय रौप्यमहोत्सवी वर्ष, भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष, संत ज्ञानेश्वर यांचे ७२५ वे संजीवन समाधी वर्ष व श्री चक्रधर स्वामी यांच्या अष्ट जन्मशताब्दी वर्षांनिमित्त )

विषय: सद्यस्थितीत संत साहित्याची प्रासंगिकता

दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

२५ & २६ मार्च २०२२

# राष्ट्रीय परिषद अहवाल

# २०२१-२२

| विभागप्रमुख, | सहाय्यक प्राध्यापक, | प्राचार्य, |
| --- | --- | --- |
| प्रा. डॉ. राजश्री पवार | प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ | डॉ. एस. आर. टकले |

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री**

**ता.फुलंब्री जि.औरंगाबाद (महाराष्ट्र)**

मराठी विभागाच्या वतीने

( श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय रौप्यमहोत्सवी वर्ष, भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष, संत ज्ञानेश्वर यांचे ७२५ वे संजीवन समाधी वर्ष व श्री चक्रधर स्वामी यांच्या अष्ट जन्मशताब्दी वर्षानिमित्त )

**विषयः सद्यस्थितीत संत साहित्याची प्रासंगिकता**

दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

२५ & २६ मार्च २०२२

---

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री येथील मराठी विभागाच्या वतीने श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, रौप्यमहोत्सवी वर्ष, भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष, संत ज्ञानेश्वर यांचे ७२५ वे संजीवन समाधी वर्ष व श्री चक्रधर स्वामी यांच्या अष्ट जन्मशताब्दी वर्षानिमित्त "सद्यस्थितीत संत साहित्याची प्रासंगिकता" या विषयावरील दोन दिवसीय आभासी राष्ट्रीय परिषद यशस्वीपणे संपन्न झाली. परिषदेच्या उद्घाटन सत्रात दिनांक २५ मार्च २०२२ रोजी जगदगुरू द्वारकाचार्य, डॉ. रामकृष्णदास महाराज लहवीतकर जि. नाशिक यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. तर यावेळी बीजभाषक म्हणून प्रा. डॉ. ताहेर पठाण, मराठी विभागप्रमुख, अलिगढ मुस्लीम विद्यापीठ, अलिगढ (उ.प्र.) यांची उपस्थिती राहिली. प्रमुख उपस्थिती प्रा. डॉ. दासू वैद्य, मराठी विभागप्रमुख, भाषा व वाड.मय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. व श्री तुकाराम बापूसाहेब गरुड (ठाकूरबुवा), अध्यक्ष, संत ठाकूरबुवा साहेब संस्थान, दैठण, जि. परभणी यांची लाभली. याप्रसंगी अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त, डॉ. सर्जेराव ठोंबरे उपस्थित राहिले.

**महाविद्यालयाची भूमिका : प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी मांडली.**

**उद्घाटक : डॉ. रामकृष्णदास महाराज लहवीतकर**

उद्घाटनप्रसंगी बोलत असताना डॉ. रामकृष्णदास महाराज लहवीतकर म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये संत साहित्याची सैद्धांतिक आणि मुलभूत अशी परंपरा आहे. संत एकनाथ महाराजांपासून ते संत निळोबारायांपर्यंत आणि यादव काळापासून ते स्वातंत्र्यानंतर देखील मोठी परंपरा असलेली दिसून येते. राजवटीचा विचार करता बहामनी काळ, पेशवाई काळ, इंग्रजी काळ, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या विविध कालखंडात अनेक सत्पुरुषांनी संत साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्राची संस्कृती ही संत साहित्यामध्ये सामावलेली आहे. हे नाकारता येणार नाही. आज महाराष्ट्रात सदाचार, सुचारुपणा, सद्वर्तन याची शिक्षा-दीक्षा देण्यासाठी

प्रा. डॉ. [signature]

विविध कालखंडात प्रयत्न झालेले दिसतात. आज देशाला व्यभिचार आणि भ्रष्टाचार असे दोन कलंक लागलेले आहेत. आणि यातून आपलं परिमार्जन व्हावं यासठी हा विचार स्वीकारताना दिसत आहेत. आज अभाव आहे तो संस्कृती आणि संस्कारांचा. म्हणून आज बिघडत चाललेल्या या वातावरणासाठी सद्यस्थितीत संत विचारांची प्रासंगिकता महत्त्वाची वाटते. असे मत व्यक्त केले.

**प्रमुख उपस्थिती : श्री तुकाराम गरुड महाराज**

श्री तुकाराम गरुड महाराज बोलत असताना म्हणाले की, विविध धर्म ग्रंथ विवेकप्रधान व मानवाला विचार देणारे असल्यामुळे त्या ग्रंथांचे वाचन लहान मुलांना करावयास लावावे म्हणजे ती मुले विवेकी बनतील. त्यांचा परिपूर्ण असा विकास घडेल. मानव जीवनाचा विकास असा घडला पाहिजे की, ईश्वरालासुद्धा तो विकास आवडला पाहिजे. ज्ञानेश्वरी कर्मप्रधान ग्रंथ असल्याने शुद्ध कर्माचा उपदेश ज्ञानेश्वरीतून होतो. आणि हे कर्म या सृष्टीला पोषक असावं हा विचार मिळतो. म्हणून सद्यस्थितीत या विविध ग्रंथांची मानवीय नैतिक मूल्य घडविण्यासाठी उपयुक्त आहे. म्हणून या ग्रंथांचा अभ्यास व्हावा हा विचार व्यक्त केला.

**प्रमुख उपस्थिती : डॉ. दासू वैद्य**

प्रमुख उपस्थितीप्रसंगी बोलत असताना, डॉ. दासू वैद्य म्हणाले की, संत साहित्य हे आपला वारसा अर्थात संचित आहे. संत साहित्य हे मानवी जीवनात निर्माण झालेले प्रश्न सोडविते. आणि त्याचबरोबर जनमानसांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाची भूमिका घेत असते. संत साहित्य हे भाक्तीकाव्य आहे या भाक्तीकाव्याच्या रसास्वादात माणसाला नम्र होता आले पाहिजे. नव्हे नव्हे तर लीन होता आले पाहिजे. म्हणजे मानव सर्जीत होत असतो. मणसाला त्याचा भवताप हरावा, नष्ट व्हावा असे वाटत असेल तर, संत साहित्यासारखं दुसरं औषध नाही. ही बाब याठिकाणी लक्षात घ्यावी लागेल. तसेच संत तुकारामांच्या विज्ञाननिष्ठ विचारांविषयी मांडलं. माणसाचं जगणं सुखी करून त्याचं उन्नयन करणं, तत्व विचारांचा आधार शोधणं हे काम संत साहित्य करताना दिसतं म्हणून सद्यस्थितीत संत साहित्याची प्रासंगिकता ही महत्त्वाची वाटते. असे मत व्यक्त केले.

**बीजभाषक : डॉ. ताहेर पठाण**

बीजभाषक म्हणून बोलत असताना डॉ. ताहेर पठाण, म्हणाले की, संत साहित्याची पाळेमुळे महाराष्ट्रात खोलवर रुजलेली आहेत. विविध सत्ता याठिकाणी होत्या, परंतु महाराष्ट्रात खरी अधिसत्ता होती ती संत विचारांचीच. मराठी भाषेच्या समृद्धीसाठी संत परंपरेने प्रोत्साहन दिलेले आहे. हे नाकारता येत नाही. १२ व्या व १३ व्या शतकात समाजप्रबोधनाबरोबर राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न संत परंपरेने केलेला आहे. संतांनी वारकरी संप्रदायाला तात्विक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. भक्तीला ज्ञानाच्या आणि अभंगाच्या जोडीने फुलविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रा.डॉ. शशिकुमार पांचाळ

पुढे ते असेही म्हणाले की, समकालीन प्रस्तुततेचा शोध घेत असताना १२ व्या शतकात मराठी भाषेला अमृत म्हणून मराठी भाषेचा गौरव केलेला आहे. तसेच संतांनी १३ व्या शतकात समता व मानवता ही मानवी चिरंतन मूल्य जगाला दिली आहेत. आणि मानवतेच्या उद्धाराची अपेक्षा ठेवली आहे. तसेच वैश्विक शांततेचीही अपेक्षा व्यक्त केली. ती आज पहावयास मिळते का? याचा शोध घ्यावा लागेल. यानुसार आपले मत व्यक्त केले.

**अध्यक्षीय समारोप : डॉ. सर्जेराव ठोंबरे**

उद्घाटन सत्राच्या अध्यक्षीय समारोपात बोलत असताना डॉ. सर्जेराव ठोंबरे म्हणाले की, संतांनी समाजाच्या सर्व स्तरावर जावून संत विचार व्यवहाराच्या पातळीवर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कर्म निर्दोष होण्याअगोदर ज्ञान निर्दोष व्हावे. परंतु हे निरंतर होणे गरजेचे आहे. त्यामुळेच खऱ्या अर्थाने समाजशुद्धी होण्यास मदत होईल. यातूनच चांगली अशी समाजबांधणी साधता येईल. म्हणून हे चेतन तत्त्व मिळवायचे असेल तर संत विचार महत्त्वाचा ठरेल. त्यानुसार सद्यस्थितीत या विचारांची फार आवश्यकता आहे. असे मत व्यक्त केले.

सूत्रसंचलन प्रा. डॉ. राजश्री पवार यांनी केले तर आभार प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी मानले.

दिनांक २५ मार्च २०२२ रोजीच्या शोधनिबंध वाचन सत्रात एकूण १० अभ्यासकांनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले.

प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ

प्रा. डॉ. राजश्री पवार

सत्र दुसरे

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता.फुलंब्री जि.औरंगाबाद (महाराष्ट्र)

मराठी विभागाच्या वतीने

( श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय रौप्यमहोत्सवी वर्ष, भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष, संत ज्ञानेश्वर यांचे ७२५ वे संजीवन समाधी वर्ष व श्री चक्रधर स्वामी यांच्या अष्ट जन्मशताब्दी वर्षानिमित्त )

## विषय: सद्यस्थितीत संत साहित्याची प्रासंगिकता

दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

सत्राध्यक्ष -प्रा.डॉ.दत्तात्रय डुंबरे, विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद २५ मिनिटे

सत्र समन्वयक -प्रा.डॉ.अनिरुध्द मोरे, इंद्राज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सिल्लोड २० मिनिटे

शोधनिबंध वाचक - दिनांक-२५ मार्च २०२२

| अ.क. | शोधनिबंध वाचकाचे नाव | महाविद्यालय | शोधनिबंध वाचनासाठी दिलेला वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रा.डॉ.पराग मुरलीधर सपाटे | सहाय्यक प्राध्यापक, स्व.संजय चांदे कला व प्रमोद चहांदे वाणिज्य महाविद्यालय, कन्हान ता.पारशिवणी जि.नागपूर | १०-१२ मिनिटे |
| २ | डॉ.चंद्रशेखर आत्माराम भगत | प्रभारी प्राचार्य, व्ही.पी.एस.कॉलेज ऑफ आर्टस् सायन्स अँण्ड कॉमर्स लोणावळा ता.मावळ, जि.पुणे | १०-१२ मिनिटे |
| ३ | प्रा.डॉ.न.व.कदम | छत्रपती शाहू महाविद्यालय, लासूर स्टेशन | १०-१२ मिनिटे |
| ४ | प्रा.डॉ.दादाराव गुंडरे | सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि.उस्मानाबाद | १०-१२ मिनिटे |
| ५ | प्रा.डॉ.ज्ञानेश्वर महादराव गाडे | विवेकानंद कनिष्ट महाविद्यालय, हिवरा आश्रम.ता.मेहकर जि.बुलढाणा | १०-१२ मिनिटे |
| ६ | प्रा.डॉ.बालाजी विठ्ठलराव डिगोळे | मराठी विभागप्रमुख, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव जि.लातूर | १०-१२ मिनिटे |
| ७ | प्रा.डॉ.स्नेहा सुवास प्रभू महांबरे | सहयोगी प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख, सरकारी कला शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, सांखळी ( गोवा ) | १०-१२ मिनिटे |
| ८ | प्रा.अरुण दामू मोरे | मराठी विभाग, पंकज कला व विज्ञान महाविद्यालय, चोपडा ता.चोपडा जि. जळगाव | १०-१२ मिनिटे |
| ९ | प्रा.डॉ.सुभाष माणिकराव कदम | मराठी विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर | १०-१२ मिनिटे |
| १० | प्रा.स्मिता सुभाष खंदारे | संत मिरा ज्युनिअर महाविद्यालय, एन-३, सिडको, औरंगाबाद | १०-१२ मिनिटे |

प्रस्तुत सत्राचे सत्र समन्वयक म्हणून प्रा. डॉ. अनिरुद्ध मोरे, इंद्रराज कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड यांनी काम पाहिले. तर सत्राध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. दत्तात्रय डुंबरे, विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद यांनी काम पाहिले.

## सत्र तिसरे

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता.फुलंब्री जि.औरंगाबाद (महाराष्ट्र)

मराठी विभागाच्या वतीने

( श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय हीरकमहोत्सवी वर्ष, भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष,
संत ज्ञानेश्वर यांचे ७२५ वे संजीवन समाधी वर्ष व श्री चक्रधर स्वामी यांच्या अष्ट जन्मशताब्दी वर्षानिमित्त )

## विषय: सद्यस्थितीत संत साहित्याची प्रासंगिकता

दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

सत्राध्यक्ष - प्रा.डॉ.नवनाथ गोरे, २५ मिनिटे

सत्र समन्वयक -प्रा.डॉ.ज्ञानेश्वर गवळीकर, यशवंत महाविद्यालय, सिल्लोड २० मिनिटे

शोधनिबंध वाचक - दिनांक-२६ मार्च २०२२ वेळ-११.०० ते ०२.००

| अ.क. | शोधनिबंध वाचकाचे नाव | महाविद्यालय | शोधनिबंध वाचनासाठी दिलेला वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रा.डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | श्री कि.न.गोयनका महाविद्यालय, कारंजा ( लाड ), जि. वाशिम | १०-१२ मिनिटे |
| २ | प्रा.डॉ.प्रकाश सूर्यवंशी | मराठी विभाग, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर | १०-१२ मिनिटे |
| ३ | प्रा.डॉ.ज्ञानेश्वर गवळीकर | यशवंत महाविद्यालय, सिल्लोड | १०-१२ मिनिटे |
| ४ | प्रा.डॉ.गजानन आनंता देवकर | कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी जि. नांदेड | १०-१२ मिनिटे |
| ५ | प्रा.डॉ.रेखा मेश्राम | राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री ता.फुलंब्री जि.औरंगाबाद | १०-१२ मिनिटे |
| ६ | प्रा.अंगद श्रीपती भुरे | दयानंद कला महाविद्यालय, लातूर | १०-१२ मिनिटे |
| ७ | प्रा.डॉ.उत्तरेश्वर सुरवसे | मराठी विभाग, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | १०-१२ मिनिटे |
| ८ | प्रा.डॉ.दीपक सूर्यवंशी | मराठी विभाग, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद | १०-१२ मिनिटे |
| ९ | डॉ.शेख रफी | छत्रपती शिवाजी महाविद्यालय, हिंगोली | १०-१२ मिनिटे |
| १० | प्रा.स्मिता सुभाष खंदारे | संत मिरा ज्युनिअर महाविद्यालय, एन-३, सिडको, औरंगाबाद | १०-१२ मिनिटे |
| ११ | प्रा.मनविता शिवदास खैरनार | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक | १०-१२ मिनिटे |

**सत्र चौथे –समारोप**

**प्रमुख मार्गदर्शक : प्रा. डॉ. सतीश बडवे**

परिषदेच्या दुसऱ्या दिवशीच्या चौथ्या – समारोप सत्रात दिनांक २६ मार्च २०२२ रोजी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. सतीश बडवे, माजी विभागप्रमुख, भाषा व वाङ्मय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. यांची उपस्थिती होती. उपस्थितांना मार्गदर्शन करत असतांना प्रा. बडवे म्हणाले की, संत साहित्यातून चिरंतन विचारांचा धागा व्यक्त होत असतो. संत साहित्याकडे बघण्याची दृष्टी कशी आहे त्यानुसार तो विचार आपणास प्रतीत होताना दिसतो. संत साहित्य हे खरोखरच आपणास मार्गदर्शक ठरते का? याचा विचार करावा लागेल. हा विचार करत असताना आजची सामाजिक परिस्थिती अनुकूल आहे का? प्रतिकूल आहे याचा विचार केला तर आजची परिस्थिती ही प्रतिकूल आहे असे म्हणावे लागेल. कारण आपल्या भोवती असणारे विचार व जे राजकारण सुरु आहे ते पहिल्यासारखे सुसंस्कृत असे राहिलेले नाही. त्याने देखील आपले वेगवेगळे रंग दाखविण्यास सुरुवात केली आहे. म्हणून आपल्या अवतीभोवतीच्या समाजाची जडणघडण चांगली व्हावी असे वाटत असेल तर ज्या ज्या उपयुक्त अशा गोष्टी आहेत, त्यापैकीच महत्त्वाचा दुवा म्हणजे संत विचार हा आहे. यातूनच समाज व समाजमनाची जडणघडण होताना दिसते. हे लक्षात घ्यावे लागेल. संत साहित्यातून एखाद्या व्यक्तित्वाची जडणघडण होत नाही तर ती संपूर्ण समष्टीची जडणघडण होत असते. यातून संस्कारमूल्य प्रसूत होताना दिसतात. याबरोबरच समाजातील ज्या नीतिमूल्यांचा मुल्यांचा ऱ्हास होत आहे, यातून या मूल्यांना वर काढण्यासाठीच संत विचार महत्त्वाचा ठरत असतो. या माध्यमातून समाजामध्ये नैतिक मूल्ये पेरण्याचा प्रयत्न संत साहित्यामधून केलेला आहे.

संत साहित्य हे समाजाला दिशा देण्याचे काम करते. त्यामुळे संत साहित्याकडे बघत असताना आपण डोळसपणे बघणे आवश्यक आहे. असे मत व्यक्त केले.


**प्रमुख उपस्थिती : प्रा. डॉ. सुनील कुलकर्णी**

प्रमुख उपस्थितीमध्ये बोलत असतांना प्रा. डॉ. सुनील कुलकर्णी, संचालक, विद्यार्थी विकास विभाग, क. ब. चौ. उ. म. विद्यापीठ, जळगाव यांनी संत साहित्यातील संत कबीर, संत तुलसी, संत तुकाराम यांच्या विचारांच्या अनुषंगाने मत व्यक्त केले. संत कबीर आणि संत तुकाराम यांचा आर्थिक, पर्यावरण विषयक, स्त्रीविषयक, व वैज्ञानिक विचारांचा दृष्टीकोन स्पष्ठ केला. पुढे ते म्हणाले की, संत साहित्य जरी १२ व्या अथवा १४ व्या शतकातील असले तरी आपण आधुनिक काळातील संदर्भ घेवून त्यांची मांडणी करणे आवश्यक आहे. वृक्षांची आपण आपुलकीने काळजी घेतली पाहिजे. त्याचा सांभाळ केला पाहिजे. ते पर्यावरणीय दृष्टीने आजही महत्वाचे आहेत. म्हणून संत साहित्याचा अभ्यास करत असतांनाआपण त्यातील विचारांची अंमलबजावणी करून ते ते विचार जीवनात आत्मसात करण्याची गरज आहे. तसेच समाजातील अनैतिक विचार संपवावयाचे असतील तर संत विचार महत्वाचा ठरू शकतो. म्हणून ज्ञानासोबत संस्कार व संस्कारासोबत मूल्यसंस्कार द्यायचा असेल तर संत साहित्याचा अभ्यास समाजाने करावा. ही अपेक्षा व्यक्त केली.


**अध्यक्षीय समारोप : श्री श्यामसुंदर नाईक**

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोप सत्राचा अध्यक्षीय समारोप पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव, श्री श्यामसुंदर नाईक यांनी केला. सूत्रसंचलन प्रा. राजश्री पवार यांनी केले तर या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेसाठी उपस्थित सर्व मान्यवर, संशोधक अभ्यासक यांचे आभार प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी मानले. परिषदेची सांगता पसायदानाने करण्यात आली.


प्रस्तुत परिषदेसाठी महाराष्ट्रातील एकूण ३७० संशोधक अभ्यासकांची नोंदणी झाली. तसेच परिषदेसंदर्भात अतिशय उत्कृष्ठ अशा प्रकारचे अभिप्राय मिळाले. यातच संस्था, महाविद्यालय यांचे यश आहे.




प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ





प्रमुख उपस्थिती प्रसंगी बोलत असताना श्री तुकाराम गरुड महाराज ( ठाकूरबुवा)





बीजभाषक म्हणून बोलत असताना प्रा. डॉ. ताहेर पठाण (उ.प्र.)

प्रा. डॉ. संजयकुमार पांचाळ





प्रमुख उपस्थिती प्रसंगी बोलत असताना प्रो. डॉ. दासू वैद्य





उद्घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे विश्वस्त, डॉ. सर्जेराव ठोंबरे

## परिषदेच्या दुसऱ्या सत्रातील शोधनिबंध वाचक














प्राचार्य


प्रा. डॉ. संजिवकुमार पांचाळ


## परिषदेच्या तिसऱ्या सत्रातील शोधनिबंध वाचक



























प्रा. डॉ. शशिकुमार मांचाळ

# समारोप सत्र



परिषदेच्या समारोप सत्रात अध्यक्षीय समारोप करतांना संस्थेचे सचिव, मा. श्यामसुंदर नाईक



परिषदेच्या समारोप सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत असतांना प्रो. सतीश बडवे



परिषदेच्या समारोप सत्रात प्रमुख उपस्थितीप्रसंगी बोलत असताना प्रो. सुनील कुलकर्णी

प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ